जयंत नारळीकर

पुस्तके, लेखक आणि मी



'आयुष्यातील जवळजवळ पंधरा वर्षे अशा विद्यापीठीय परिसरात वावरलो'

माझ्या 'पाठ्यजीवना'बद्दल लिहिताना माझ्याबद्दल थोडी माहिती देणे टाळता येत नाही. केवळ संदर्भासाठी म्हणून काही तपशील देतो. माझा जन्म कोल्हापूरचा पण माझे बालपण बनारसमध्ये गेले. आयुष्यातली पहिली एकोणीस वर्षे बनारसमध्ये, त्यानंतरची पंधरा केंब्रिजमध्ये व भारतात परतल्यावर काही महिन्यांपूर्वीपर्यंतची जवळ जवळ सतरा वर्षे मुंबईत असे हे एकूण एक्कावन्न वर्षांचे गणित आहे. हा सर्व काळ मध्यमवर्गात शिक्षण-संशोधन अध्यापनाच्या वातावरणात गेला. म्हणून पुस्तकांशी जवळीक सतत राहिली.

अगदी लहानपणापासून, वाचता यायला लागण्यापूर्वीपासून माझा व माझ्या धाकट्या भावाचा पुस्तकांशी संबंध आला. माझ्या वडिलांना पुस्तके वाचण्याचा आणि विकत घेऊन संग्रही ठेवण्याचा भयंकर नाद. त्यामुळे घरात पुस्तकांची कपाटे भरपूर. शिवाय टेबलावर, अभ्यासिकेतल्या खुर्च्यांवर आणि पुष्कळदा फरशीवर आंथरलेल्या सतरंजीवर पुस्तके पसरलेली. अशाच एका खोलीत उड्या मारायची प्रॅक्टिस करत असता माझी एक लाँगजंप रेकॉर्ड ब्रेक करून समोरच्या कपाटाची काच पण ब्रेक करून गेली. त्या कर्तबगारीचे चिन्ह आजही माझ्या उजव्या पावलावर आहे.

पण पुस्तके केवळ कपाटात ठेवण्याच्या शोभेच्या वस्तू नसून त्यांत काहीतरी मनोरंजक असते याची जाणीव आम्हाला करून दिली आमच्या आईने 'गोष्ट' म्हणजे काय हे ज्या वयात कळायला लागते तेव्हापासून अनेक वर्षांपर्यंत तिने आम्हाला विविध प्रकारच्या गोष्टी सांगितल्या, वाचून दाखवल्या. त्यांत रामायण, महाभारत व पुराणे किंवा 'ग्रिम्स फेअरी टेल्स'पासून हरी नारायण आपटे आणि नाथमाधवांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या, चिपळूणकरांनी अनुवादिलेल्या 'अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टी' चिं. वि. जोश्यांचे चिमणराव पुराण, तसेच इंग्रजीत ड्यूमाचा काउंट ऑफ मॉंटे ख्रिस्टो, कॉनन डॉयलचा शेरलॉक होम्स, डिकन्सचे पिकविक पेपर्स, डेविड कॉपरफील्ड आणि ऑलिवर ट्विस्ट, पी. जी. वुडहाउसच्या गोष्टी, तर हिंदीत खत्रींची प्रख्यात गुप्तचरांची कादंबरी चंद्रकांता, प्रेमचंदांच्या गोष्टी आणि बेढब बनारसीचे 'लफ्टंट पिगसत की डायरी' इत्यादी पुस्तकांचा उल्लेख करावासा वाटतो.

निजता निजता ऐकलेल्या त्या गोष्टींची मालिका प्रचंड आहे. पुढे तीच पुस्तके स्वतः वाचताना किंवा त्या लेखकांचे इतर वाङ्मय वाचताना एक वेगळाच आनंद वाटे. त्या काळी टेलिव्हिजन नसल्याने पुस्तकांशी जवळीक साधता आली असे आज वाटते. कुठल्याही गृहिणीला 'घर संभाळणे' हे दिवसाचे चोवीस तास खाणारे काम असते. आमच्या आईला आम्ही दोघांनी 'हजार भानगडीदार' हे टोपणनाव दिले होते. पण त्या हजार भानगडीतून आम्हांला गोष्टी वाचून दाखवायला तिने वेळ काढला त्याचे महत्त्व आज जाणवते.

आजच्या धकाधकीच्या जीवनात आई-वडिलांना आपल्या मुलामुलींना गोष्टी सांगायला वेळ मिळत नसेल, तर ती एक दुर्दैवाची गोष्ट म्हटली पाहिजे. गोष्टी ऐकून ऐकून पुढे स्वतः पुस्तके वाचायची इच्छा मुलांच्या मनात स्वाभाविकपणे होते, असे मला माझ्या स्वतःच्या आणि माझ्या मुलीच्या अनुभवावरून वाटते. माझ्या लहानपणी आजकालसारखी 'कॉमिक्स' क्वचितच असत. लहान मुलांत वाचनाची गोडी निर्माण करायला कॉमिक पुस्तके निश्चितच हातभार लावतात. त्यातून 'अमर चित्रकथा' सारख्या मालिकेने आपल्या पौराणिक, ऐतिहासिक आणि इतर साहित्याला लहानांपुढे मांडण्यात महत्त्वाचा हातभार लावला आहे. परंतु वाढत्या वयाप्रमाणे चित्रकथा सोडून मूळ वाङ्मय वाचण्याकडे मुलांना प्रवृत्त करणे पालकांचे कर्तव्य आहे.

माझ्या आईने मला संस्कृत भाषेतील वाङ्मयदेखील वाचण्याची गोडी लावली. तिची स्वतःची संस्कृतची एम. ए. डिग्री असल्याने संस्कृत टीकेच्या आधारे तिने मला कालीदास, भवभूती आदींची पुस्तके वाचण्यात मदत केली. तिने आणि माझे मामा (कै. मोरेश्वर हुजुरबाजार) यांनी मला संस्कृतच्या खुब्या दाखवून दिल्या. शाळेतून कॉलेजात प्रवेश करताना गणित आणि विज्ञानाची कास न सोडता मला संस्कृत विषय घेता आला नाही याची खंत वाटते. पुढे केंब्रिज विद्यापीठात विद्यार्थी दशेत असताना मी फावल्या वेळी तेथील मुख्य ग्रंथालयात संस्कृत पुस्तके वाचीत असे.

माझ्या वडिलांच्या वाचनाचा आवाका प्रचंड होता, जो मला कधीच साधला नाही. बनारस हिन्दू युनिव्हर्सिटीत पं. मदन मोहन मालवीय आणि डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या सान्निध्यात असल्याने आणि त्यांच्या लहानपणच्या घरातल्या आध्यात्मिक वातावरणामुळे माझ्या वडिलांचे वाचन अध्यात्म, तत्त्वज्ञान, मानवतावाद आदींकडे पण झुकलेले असे. त्यामुळे घरात विविध धर्मांचे ग्रंथ, तत्त्ववेत्त्यांची पुस्तके आणि अशा विषयांवर लेख असलेली नियतकालिके असत. आम्ही लहान मुले ही पुस्तके दुरूनच पाहात असू.

डोळा विनोदी पुस्तकांवर

आमचा डोळा असे विनोदी पुस्तकांवर, विशेष करून पी. जी. वुडहाउसवर ! ह्या विनोदी लेखकाची पोशाख करून इंग्लंडमध्ये फिरताना सापडला अशी आख्यायिका आहे. त्याने पायात 'स्पॅट्स' घातले होते ज्यांची फॅशन केव्हाच गेली होती !)

साचे ठरलेले

वुडहाउसच्या कथांचे साचे ठरलेले आहेत. कजाग मावश्या आणि आत्याबाई, विसरभोळा आणि आपल्या एखाद्या द्वंद्वात मग्न कुटुंबप्रमुख, कसलाही कामधंदा न करणारे पण एखाद्या काकाकडच्या पॉकेटमनीवर चैन करणारे तरुण आणि आपल्या प्रेयसीचे प्रियाराधन करता यावे म्हणून तोतयागिरी करणारे काही तडफदार रोमिओ अशा विनोदी व्यक्तिचित्रांवर रचलेल्या कथानकांत वेगळेपणा नसला तरी परिस्थितीजन्य विनोद आणि इंग्रजीवरील असामान्य प्रभुत्वामुळे वुडहाउसची पुस्तके पुनः पुन्हा वाचावीशी वाटतात. एका टीकाकाराने म्हटले की वुडहाउसची कथानके बदलत नाहीत, फक्त पात्रांची नावे बदलतात. ह्या 'अरसिक' माणसाला उत्तर देताना आपल्या एका नवीन कादंबरीच्या प्रस्तावनेत वुडहाउसने म्हटले, 'ठीक आहे, ह्या वेळी मी पात्रांची नावेदेखील बदलली नाहीत'. असे असूनही वुडहाउसचे लेखन 'क्षणे क्षणे यन्नवतां उपैति' अशा प्रकारचे आहे.

परंतु खुद्द त्याच्या देशात, इंग्लंडमध्ये वुडहाउसचा द्वेष करणारे लोक आहेत याची जाणीव मला त्या देशात गेल्यावर झाली. माझी लँडलेडी, एरव्ही बोलताना सौम्य आणि प्रेमळ, पण माझ्याकडे लायब्ररीतून आणलेली वुडहाउसची पुस्तके पाहून तिच्या कपाळावर आठी आली. 'दुसऱ्या महायुद्धातल्या त्याच्या देशद्रोही वर्तनामुळे आम्ही त्याची पुस्तके वाचत नाही' हा तिचा खुलासा ऐकून मला धक्काच बसला. वस्तुस्थिती काय होती ती नंतर हळूहळू कळली आणि

नारळीकर आणि फ्रेड हॉयेल



'पुस्तकांच्या दुकानात शिरलो की मला एकप्रकारची मानसिक अस्वस्थता जाणवते ! कपाटात आकर्षकपणे रचलेली असोत किंवा ढिगाऱ्यात अस्ताव्यस्त पडलेली असोत... अशी असंख्य पुस्तके आहेत की जी वाचाविशी तर वाटतात, पण वेळेअभावी ते शक्य तसते. त्यासाठी जर दिवसाला पन्नास तास आणि वर्षात हजार दिवस असतील तर ?....'

बहुतेक पुस्तके आमच्याकडे होती. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या दशकात जसजशी वुडहाउसची नवी पुस्तके प्रसिद्ध होत तसतशी ती मिळवण्याचा आम्ही प्रयत्न करत असू. बनारसमध्ये ती पुस्तके सहसा उपलब्ध होत नसत म्हणून 'न्यू बुक कंपनी, हॉर्नबी रोड मुंबई' पत्त्यावर आमची ऑर्डर जाई व तेथून येणाऱ्या व्ही. पी. ची आम्ही उत्सुकतेने वाट पहात असू.

हे वुडहाउसबद्दलचे वेड माझे आजपर्यंत कायम आहे. कोणालाही न दुखवता केलेला निर्भेळ विनोद इथे पहायला मिळतो. विनोदी लेखन थिल्लर असते असा एक गैरसमज प्रचारात आहे. उत्तम विनोदी लेखन निर्मिती अवघड असते हे वाचकाला कळत नाही. ते लेखकच जाणे. स्वतः वुडहाउसने ह्याचा आवर्जून उल्लेख केला आहे.

हिलॅर बेलॉकने वुडहाउसला इंग्रजीचा सर्वोत्तम गद्यलेखक म्हटले याहून योग्य पावती ती काय असणार ? इंग्रजी भाषेचे वैभव, तिची लवचिकता, तिचे सौष्ठव यांचा साक्षात्कार जसा वुडहाउसच्या स्वाभाविक विनोदातून होतो तसा इतर लेखकांच्या साहित्य, तत्त्वज्ञान आणि धर्म अशा गंभीर विषयांतील लेखनातून होत नाही.

जीव्ज आणि बर्टी वुस्त्र, लॉर्ड ए.स्वर्थ, यूक्रिज, मिस्टर मालिनर, गॉल्फ क्लबचा सर्वात जुना मेंबर इत्यादी पात्रे वुडहाउसने इंग्रजी वाङ्मयात अजरामर केली आहेत. गंमत म्हणजे वुडहाउसच्या कथा-कादंबऱ्यांमध्ये नेमक्या कुठल्या काळातल्या इंग्लंडचे चित्रीकरण आहे ते सांगणे अवघड आहे.... कारण तसे इंग्लंड कधीच नव्हते ! त्यातल्या त्यात पहिल्या महायुद्धापूर्वीचे 'एडवार्डियन' इंग्लंड तसे असावे. पण वुडहाउसच्या १९७५ पर्यंतच्या साहित्यात इंग्लंडचे रूप तसेच राहिले. (दुसऱ्या महायुद्धात एक जर्मन हेर वुडहाउसच्या पुस्तकातील वर्णनाबरहुकूम इंग्लिश गावसाचा होता तो मनोरं हळूहळू पकडला जाऊन वुडहाउसबद्दल युद्धकाळानंतर अनेक वर्षे प्रचलित असलेल्या गैरसमजाचे ते एक उदाहरण होते याची जाणीव झाली.

दुसरे महायुद्ध सुरू झाले आणि जर्मनीने लगेच फ्रान्स पादाक्रांत केला. त्यावेळी फ्रान्समध्ये अडकून पडलेल्या अनेक ब्रिटिश नागरिकांप्रमाणे वुडहाउसही जर्मनांच्या अटकेत सापडला. युद्धकैद्यांच्या शिबिरात त्याने कित्येक महिने तेथील हाल-अपेष्टा सोसल्या. त्या काळात एका अमेरिकन वार्ताहराच्या मार्फत त्याने आपले तेथील अनुभव ध्वनिमुद्रित केले. कठीण परिस्थितीतदेखील त्याची विनोदबुद्धी शाबूत होती व त्याने कैद्यांच्या शिबिरातल्या जीवनाचे विनोदी वर्णन केले आणि आपल्या जर्मन तुरुंगाधिकाऱ्याची टर उडवली. ते लक्षात न घेता त्याची ही भाष्ये जर्मनांनी प्रचाराचा भाग म्हणून आपल्या रेडिओवरून प्रसारित केली. परंतु जर्मन विमानहल्ल्यांनी पोळलेली ब्रिटिश जनता विनोदी ऐकण्या, समजण्याच्या मनस्थितीत नव्हती. त्यातून कसांड्रा, डफकूपरसारखे काही शिष्ट असेही निघाले की त्यांनी वुडहाउसच्या भाषणांचा उपयोग त्याची बदनामी करायला केला.

युद्धकाळात शत्रूच्या प्रसिद्धीमाध्यमांचा उपयोग (त्याची टर उडवण्यासाठी देखील) करू नये हे वुडहाउसच्या ध्यानात आले नाही ही त्याची चूक नक्कीच... पण त्याला देशद्रोही म्हणता येणार नाही. जॉर्ज ऑर्वेल, ईवलिन वॉगसारख्या प्रसिद्ध लेखकांनी वुडहाउसच्या बाजूने रदबदली केली आणि 'देशद्रोहा'चा काळिमा पुसून काढला. परंतु त्याच्याबद्दलची अढी अनेक काळ ब्रिटिश जनतेच्या मनात राहून गेली. ती पुसायला पुष्कळ काळ जावा लागला. म्हणूनच वुडहाउसने पुन्हा कधी इंग्लंडला भेट दिली नाही. त्याचे वास्तव्य कायमचे अमेरिकेत राहिले.

आज वुडहाउसची लोकप्रियता

ब्रिटनमध्येही आहे. त्याचे एक स्मारक त्याच्या ग्रंथालय आणि अभ्यासिकेच्या रूपाने त्याच्या शाळेत, डलिच कॉलेजात आहे. राणीने त्याला (त्याच्या आयुष्याच्या शेवटच्या वर्षी) 'सर' केले. खुद्द राणीमाता त्याच्या चहात्यांपैकी आहे. 'वुडहाउस सोसायटी'च्या माध्यमाने त्याचे आणि त्याच्यावरचे साहित्य अधिकाधिक लोकप्रिय होत आहे. डलिच कॉलेजच्या स्मारकाला अलीकडेच भेट देताना मिळालेली ही माहिती आहे.

मी केंब्रिजला विद्यार्थी असतानाची गोष्ट. कॅम नदीकाठी हिरवळीवर मी आणि माझा एक मित्र बसलो होतो. किंग्स कॉलेजच्या चॅपल आणि गिन्सने बांधलेल्या इमारतीपुढच्या प्रशस्त हिरवळीवर एक वृद्ध व्यक्ती सावकाश जात होती.

''ते पहा ई. एम. फॉस्टर'' माझ्या मित्राने सांगितले.

''ई. एम. फॉस्टर ?''

''अरे ते 'पॅसेज टू इंडिया'चे लेखक''

मित्राच्या खुलाशाने माझ्या डोक्यात प्रकाश पडला. 'पॅसेज टू इंडिया' आणि 'फॉस्टर' ही नावे माहीत होती, पण पुस्तक अजून वाचले नव्हते आणि लेखकाला प्रथमच पाहात होतो... वीस यार्डांवरून. त्यावेळी अशी कल्पनाही नव्हती की मी काही वर्षांनी किंग्स कॉलेजमध्ये फेलो होएंन आणि ई. एम. फॉस्टरच्या शेजारी रहायला जाईन.

फॉस्टरच्या सान्निध्यात

ज्या दिवशी मला कॉलेजच्या फेलोची दीक्षा देण्यात आली त्या रात्रीच्या मेजवानीत हाय टेबलवर माझ्यासमोर फॉस्टर बसले होते. माझी चौकशी करताना त्यांनी विचारले : ''जन्म कुठे झाला ?'' मी 'कोल्हापुरात' म्हटल्यावर त्यांचा चेहरा एकदम उजळला. त्यांनी लगेच खुलासा केला. ते स्वतः देवास संस्थानच्या महाराजांचे प्रायव्हेट सेक्रेटरी होते. यामुळे देवास आणि कोल्हापूर राजघराण्यांचे जवळचे संबंध त्यांना माहित होते व त्यांनी जवळून पाहिले होते. ''मला कोल्हापूरबद्दल जाणण्याची पुष्कळ उत्सुकता आहे'', ते म्हणाले.

पुढे त्यांच्या शिफारसीवरून मला त्यांच्या शेजारच्या खोल्यांचा सूट रहायला मिळाला. तोपर्यंत अर्थात् मी 'पॅसेज टू इंडिया' वाचून काढले होते आणि त्या पुस्तकावर शांता रामा राव

इ. एम. फॉस्टर



यांनी रचलेले नाटकही पाहिले होते. भारताचे, भारतीयांचे आणि त्यांच्या अस्मितेचे स्वातंत्र्यपूर्व काळात फॉस्टरनी जितके सूक्ष्म अवलोकन केले तितके दुसऱ्या कोणा पाश्चात्य लेखकाने केलेले मी पाहिले नाही. त्यामुळे फॉस्टर ही व्यक्ती जवळून पहायची उत्सुकता होती. तो मौका आता मिळाला.

''मला मॉर्गन म्हणत जा... मी तुला 'जयंत' म्हणत जाईन.'' माझ्यापेक्षा जवळजवळ पाच दशके अधिक पाहिलेल्या व्यक्तीला एकेरी नावाने संबोधणे मला जड गेले असते... पण 'मॉर्गन'च्या सौम्य, अनौपचारिक वागणुकीमुळे मला लवकरच तो सराव झाला.

त्यांचे देवासचे अनुभव सांगणारे आत्मचरित्रपर पुस्तक 'द हिल ऑफ देवी' हे त्याच सुमारास प्रसिद्ध झालेले मी वाचले. अनौपचारिक शैलीमुळे ते विशेष वाचनीय झाले आहे. सुरवातीलाच देवासला आल्यावर दरबारच्या मेजवानीच्या सचित्र वर्णनात लेखकाच्या अवलोकनशक्तीची आणि विनोदी वृत्तीची साक्ष पटते. मोजक्या शब्दांत पुष्कळ काही सांगण्याचे कसब जसे फॉस्टर यांच्या लेखनात दिसते तसेच त्यांच्या बोलण्यातही असे.

खगोलशास्त्रावर संशोधन करणारा मी अशा असामान्य साहित्यिकाशी कुठल्या विषयावर गप्पा मारू शकेन, अशी मला शंका होती. मॉर्गनने ती बिनबुडाची ठरवली. त्यांचे शिक्षण राणी व्हिक्टोरिया आणि सातव्या एडवर्डच्या जमान्यातले, आधुनिक विज्ञानाचा गंधही नसलेले. परंतु त्यांना विज्ञान, तंत्रज्ञानाबद्दल खूप उत्सुकता होती. म्हणून खगोल विज्ञानातील नव्या शोधांबद्दल आमची पुष्कळ चर्चा होत असे आणि एक दिवस त्यांनी आपल्या

(पान चारवर)

पुस्तके, लेखक आणि मी

(पान दोनवरून)

नेहमीच्या सौम्य भाषेत मला एक आश्चर्याचा धक्काच दिला.

''मी काही वर्षांपूर्वी एक विज्ञानकथा लिहिली होती.''

'द मशीन स्टॉप्स' ही ती कथा. यंत्रावलंबी मानव संस्कृतीचे चित्र तीत त्यांनी रंगवले आहे... एका मोठ्या यंत्रामुळे सर्व मानवांचे जीवन आरामात चालले असताना ते यंत्र बंद पडल्यावर काय घडेल ? उत्कृष्ट विज्ञानकथा लिहायला साहित्यिकाने वैज्ञानिक असायची आवश्यकता नाही... विज्ञानाचे समाजावर काय परिणाम होत आहेत आणि होतील याची जाण असली की पुरे.

एक संस्मरणीय संवाद


माझ्या जीवनातील काही निवडक संस्मरणीय प्रसंगांत 'फॉस्टर-हॉयेल संवाद' हा एक आहे. मी फ्रेड हॉयेलबरोबर संशोधन करतो हे ऐकून मॉर्गनने एक दिवस हॉयेलशी भेटण्याची इच्छा व्यक्त केली. फॉस्टर माझे शेजारी आहेत तेव्हा त्यांच्याबद्दल हॉयेलनीही कुतूहल व्यक्त केले होते. त्यामुळे ती भेट घडवून आणणे अवघड नव्हते. मॉर्गनच्या खोलीत चहा आणि सॅण्डविचेस खाता खाता ह्या दोन विचारवंतांमध्ये अनेक गोष्टींवर चर्चा झाली... विज्ञान आणि समाज, मानवतावाद आणि देवाची कल्पना, सृष्टीबद्दल जाणून घेण्याची विज्ञानाची ऐपत आणि मर्यादित कुवत आणि पाश्चात्य दर्जेदार संगीत... मला खंत एवढीच वाटते की मी ते संभाषण त्या दोघांच्या नकळत ध्वनिमुद्रित केले नाही.

पाश्चात्य संगीताचा आस्वाद कसा घ्यावा हे मला बरेचसे मॉर्गनकडून कळले. त्यावेळचे किंग्स कॉलेजचे संगीताचे शिक्षक मला एकदा म्हणाले, ''मी माझ्या नव्या विद्यार्थ्यांना मॉर्गनच्या 'हॉर्वर्डस् एन्ड' कादंबरीतले ते प्रकरण वाचायला सांगतो जे त्यांनी पाचव्या सिंफनीवर लिहिले आहे.'' 'त्या' प्रकरणात बेथोवनची ती सिंफनी ऐकताना मनात काय विचार येतात ते मॉर्गनने सहजगत्या कॉन्सर्टला आलेल्या पात्राच्या माध्यमाने व्यक्त केले आहेत.

फ्रेड हॉयेलबरोबर संशोधन करताना मला त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू पहावयास मिळाले. त्यांची कल्पनाशक्ती आणि सृजनक्षमता अचाट.... आज वयाच्या पंचाहत्तराव्या वर्षात पदार्पण केले असतानाही नवे विचार मांडणे आणि खोलात जाऊन त्यांचा पाठपुरावा करणे हे त्यांना तितकेच साधते – जितके पन्नास वर्षांपूर्वी साधत असे. त्यांचे विचार केवळ अभ्यासिकेत किंवा वर्गातील फळ्यासमोरच धावत नसत.... डोंगराळ भागात हायकिंग करताना, किंवा प्रवासात मोटर कार चालवताना अथवा क्रिकेट मॅच पहात असताना एकदम एखादी वैज्ञानिक कल्पना ते शेजाऱ्यासमोर बोलून दाखवत.

ह्या कल्पनांपैकी काहींनी खगोल विज्ञानाला नवी क्षितिजे उघडून दिली. काही तर इतरांच्या क्षितिजापलीकडल्या असल्याने आपल्या वैज्ञानिक बंधूंना पटवण्यात ते अयशस्वी ठरले. अशीच एक कल्पना १९५५ च्या आसपास त्यांनी मांडली की अंतराळात रासायनिक रेणूंचे प्रचंड ढग असावेत. त्याकाळी वैज्ञानिकांना हायड्रोजन अणूचे अस्तित्व ताऱ्यां दरम्यानच्या विस्तीर्ण प्रदेशात सापडले होते, पण अणूपासून रेणूपर्यंतचा टप्पा अंतराळात गाठला जात असेल हे मान्य करायची त्यांची तयारी नव्हती. म्हणून हॉयेलची कल्पना प्रबंधरूपाने प्रसिद्ध करायला वैज्ञानिक नियतकालिके धजत नव्हती.

शेवटी हॉयेलनी ह्या कल्पनेवर आधारलेली एक विज्ञानरंजक कादंबरी लिहिली... 'द ब्लॅक क्लाउड'. त्यामध्ये कल्पनाविलास मूळ कल्पने पलीकडे नेला आहे. काळा ढग पृथ्वीकडे प्रचंड वेगाने येताना दिसतो... पण तो जवळ येताना वेग कमी करतो – जशी आगगाडी स्टेशनवर पोचताना करते. शेवटी तो सूर्याभोवती ठाण मांडतो. कारण ह्या मेघात विचार करायची शक्ती असते आणि सूर्यापासून आपल्याला आवश्यक ऊर्जा त्याला घ्यायची असते. अशा पार्श्वभूमीवर रंगवलेली ही कादंबरी पुष्कळ गाजली आणि विज्ञानकथेचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून ती मानली जाते.



१९६० नंतर मायक्रोवेव्ह व मिलिमीटर वेव्ह लहरींद्वारे विश्वाचे वेध घेताना खगोल शास्त्रज्ञांना रेणूंचे अस्तित्व दिसून आले. 'रेणूंचे मेघ' ही कल्पना आज अवास्तव मानली जात नाही. काही रेणू तर मोठे कार्बनिक स्वरूपाचे असल्याने विश्वात इतरत्र जीवसृष्टी असण्याची संभाव्यता वाढली आहे.

विज्ञानकथांचे प्रचंड साहित्य इंग्रजीत बाहेर येत आहे. बहुतेक साहित्य वैज्ञानिक कल्पनांच्या दृष्टीने विचारप्रवर्तक नसते आणि साहित्याच्या दृष्टीने निकृष्ट असते. आर्थर सी. क्लार्क, रे ब्रॅडबरी, आयझॅक ॲसिमॉव्हसारखे काही निवडक लेखक मात्र असे आहेत, ज्यांनी विज्ञान कथासाहित्याला मानाचे स्थान प्राप्त करून दिले आहे.

मी हॉयेलबरोबर स्वित्झर्लंड येथील झर्मांट गावी हायकिंगला गेलो होतो. सकाळभर चालून परतल्यावर चहासाठी दुपारी हॉयेल यांच्या हॉटेलात भेटायचे ठरले होते. तेथे चारच्या सुमारास मी पोचलो तेव्हा ते काहीतरी लिहीत होते.

''काय लिहिताय ?''

''एक कल्पना सुचली सकाळी फिरताना. म्हणून लहान मुलांसाठी एक विज्ञान नाटिका लिहितोय'' केक खात ते उत्तरले.

अशा तऱ्हेने हॉयेलच्या लेखनास सुरुवात होई. पुढच्या वर्षी ईस्टरच्या सुटीत हॉयेलची ती नाटिका 'रॉकेट्स इन अर्सा मेजर' त्यांचे मित्र बर्नर्ड माइल्स यांनी लंडनमध्ये थेम्स काठच्या स्वतःच्या मरमेड थिएटरमध्ये आयोजित केलेली मी पाहिली. खास मुलांसाठी, आखलेल्या त्या उपक्रमाला मुलांकडून, शाळांकडून आणि पालकांकडून पुष्कळ दाद मिळाली.

अचानक खांद्यावर थाप

माझ्या केंब्रिजच्या वास्तव्यात ते शहर आणि विद्यापीठ पहायला येणाऱ्या अनेक भारतीयांशी भेट झाली, त्यांत दोन लेखक होते.... पी. के आणि पी. एल. लंडनच्या होटेल शारुणात भेळ मिळते ही महत्त्वाची माहिती मिळाल्यामुळे मी आणि माझे केंब्रिजमधील मित्र शशीकुमार चित्रे मुद्दाम तेथे गेलो. भेळ खात असताना माझ्या खांद्यावर थाप पडली. मागे एक धिप्पाड व्यक्ती उभी होती.

''काय जयंतराव, लंडनमध्ये येऊन भेळ कसली खाता ? मी आत्ताच एग आणि बेकनचा अस्सल इंग्रजी ब्रेकफास्ट करून आलोय''

मागे आचार्य अत्रे उभे होते.

मी आचार्यांना सांगितले... आपणाला इंग्रजी नाश्त्याचे जसे नाविन्य तसे आम्हाला भेळेचे... मी आठ वर्षांनी भेळ खात होतो.

आणि तेथे सुरू झालेल्या गप्पा दोन तीन दिवसांनी केंब्रिज पहात फिरताना चालू राहिल्या. विनोदी आणि गंभीर, उदास आणि टवाळखोर सर्व प्रकारच्या लेखनात बाजी मारणाऱ्या आचार्य अत्र्यांच्या बहुरंगी प्रतिभेचे पडसाद त्या गप्पांत उमटत होते. मनातले विचार स्पष्ट बोलून दाखवणारा आणि बेधडकपणे कागदावर उतरवणारा दुसरा लेखक मी पाहिला नाही.

चित्रे आणि मी एडिन्बरा फेस्टिव्हल पहायला गेलो असताना प्रिन्सेस स्ट्रीटवर आम्हाला एक मराठी दांपत्य भेटले... पी. एल. आणि सुनीताताई. मी शाळेत असताना पी. एल. बनारसला आमच्या घरी येऊन गेल्याची आठवण होती. त्यावेळी म्युजिक कॉलेजमध्ये प्राचार्य पं. ओंकारनाथ ठाकुरांच्या उपस्थितीत त्यांचा पेटीवादनाचा (एका हाताने) कार्यक्रम पाहिल्याचे आठवत होते. आणि 'गुळाचा गणपती' सिनेमात त्यांना 'हीरो' म्हणूनही पाहिले होते. त्यामुळे त्यांना केंब्रिज दाखवायची जबाबदारी चित्रे आणि मी, आम्ही दोघांनी आनंदाने स्वीकारली.

केंब्रिजचे वर्णन पी. एल. नी 'अपूर्वाई'त आपल्या समर्थ शैलीत केले आहे, त्यात मी भर घालत नाही. पुष्कळ फिरून झाल्यावर, चित्र्यांच्या खोलीत चहापानाचा कार्यक्रम झाला त्यावेळी पी. एल. नी 'बटाट्याची चाळ' मधील शेवटचे प्रकरण 'एक चिंतन' वाचले महाराष्ट्राबाहेर वाढलो असल्याने मला बटाट्याची चाळ परिचित नव्हती. पण पुढे मुंबईला भेट देताना ती वाचून काढली आणि साहजिकच पी. एल. च्या वाचक चहात्यांत एकाची भर पडली.

मराठी वाङ्मयाशी माझा जवळचा संपर्क महाराष्ट्रात स्थायिक झाल्यावर सुरू झाला. कथासाहित्य, दलित वाङ्मय, काव्यसंग्रह, नाटके इत्यादीची माहिती मला आहे ती सामान्य वाचकाला असते तेवढीच... समीक्षकाइतकी किंवा प्राध्यापकाइतकी मुळीच नाही, 'रामचरितमानस' लिहिताना तुलसीदासाने कारण दिले 'स्वान्तःसुखाय' माझे वाचनदेखील स्वान्तःसुखाय असते. त्यामुळे दरवेळी काहीतरी नवीनच वाचले पाहिजे असा माझा कटाक्ष नसतो.

तरी पण, पुस्तकाच्या दुकानात शिरलो की मला एक प्रकारची मानसिक अस्वस्थता जाणवते ! कपाटात आकर्षकपणे रचलेली असोत किंवा ढिगाऱ्यात अस्ताव्यस्त पडलेली असोत.. अशी असंख्य पुस्तके आहेत जी वाचाविशी तर वाटतात, पण वेळेअभावी ते शक्य नसते. जर दिवसात पन्नास तास आणि वर्षात हजार दिवस असते तर... तर आपल्याला वाचायला अधिक वेळ मिळाला असता.

पण त्याचा काही उपयोग नाही ! कारण त्या वेळात लेखकांनी ही अधिक लेखन केले असते आणि ही तफावत कायम राहिली असती..